IIP International Multidisciplinary Research Journal
IIPIMRJ

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 03 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# “राहुरी तालुक्यातील कणगर गाव: ऐतिहासिक आणि पौराणिक परंपरांचा अभ्यास”

[1]वैशाली डौले, [2]प्रो. डॉ. मीना साळे
संशोधक विद्यार्थी, न्यू आर्ट्स,सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, अहिल्यानगर
संशोधक मार्गदर्शक, न्यू आर्ट्स,सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, अहिल्यानगर

**Article Info**

***Article History:***
Received: 24th January 2026
Accepted: 01st February 2026
Published: 05th February 2026

***Keywords:***

*राहुरी*

**ABSTRACT**

राहुरी तालुक्याचा परिसर हा पुरातन असून हा भाग पौराणिक काळात दंडकअरण्य म्हणून ओळखला जातो. या भागात घनदाट अरण्य होते जंगलातील झाडे तोडून गावांची निर्मिती झाली. पूर्वेला गर्भगिरीच्या डोंगरापर्यंत, दक्षिणेला सह्याद्रीच्या रांगा, पश्चिमेला डोंगर पठारांचा भाग, उत्तरेला प्रवरा नदीच्या काठी तर दक्षिणेला मुळा नदी अशा या राहुरी तालुक्याची भौगोलिक सीमा आहे. ताहराबाद येथील प्रसिध्द संत महिपती महाराज, तांभेरेचे संत मोरेश्वर महाराज, मालुंजे येथील सखाराम महाराज, देवळालीचे संत त्र्यंबकराज महाराज यांच्या वास्तव्याने पावन झालेले आहेत. राहुरी तालुकातील कनगर हे गाव सूळ्या डोंगराच्या पायथ्याशी वसलेले पौराणिक निसर्गरम्य गाव आहे.१

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: February 02, 2026
Similarity Index: 5%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Daule, V., & Sale, M. (2026).** राहुरी तालुक्यातील कणगर गाव: ऐतिहासिक आणि पौराणिक परंपरांचा अभ्यास. *IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 3(1), 837–840.*

**संशोधनाची उद्दीष्टे:**

१) कणगर गावाचा इतिहास जाणून घेणे.

२) गावातील ऐतिहासिक ठिकाणे आणि घटना अभ्यासणे.

३) गावातील देवस्थाने,मंदिरे आणि लोककथा यांची माहिती समजावून घेणे.

४) गावातील पौराणिक परंपरा आणि ऐतिहासिक वारसांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके:**

**१)** ऐतिहासिक ठिकाणे आणि घटना परंपरा टिकवतात.

२) कणगर गावाचा इतिहास गावकऱ्याच्या जीवनावर परिणाम करतात.

३) देवस्थान आणि पौराणिक परंपरां लोकांमध्ये एकता वाढवतात**.**

**कणगर गावाचे स्थान:**

हे गाव राहुरी शहराच्या पश्चिमेस सुमारे १५ किलोमीटर अंतरावर स्थित आहे. कणगरच्या पूर्वेस चिंचविहिरे, दक्षिणेस चिंचाळे, पश्चिमेस पेशवेकालीन ताहराबाद आणि वडनेर, तर उत्तरेस ऐतिहासिक गुहा ही गावे आहेत. कणगर गावाच्या आठ किलोमीटर अंतरावर प्रवरा नदी वाहते. गावाच्या पश्चिमेकडे कणकावती तलाव आणि उंबरदरा पाझर तलाव आहेत. या तलावांमध्ये पावसाचे पाणी साठवले जाते, त्यामुळे परिसरातील विहिरींमधील पाण्याची पातळी वाढून शेतीसाठी पाणीपुरवठा सुधारला आहे. गावाच्या दक्षिणेस सुमारे १५ किलोमीटर अंतरावर मुळा नदी आहे. हे नैसर्गिक सौंदर्य, पौराणिक पार्श्वभूमी आणि समृद्ध जलसंपत्तीने नटलेले एक रमणीय आणि ऐतिहासिक गाव आहे.[२]

**कणगर गावाचा पौराणिक वारसा**:

कणगर गावाच्या दक्षिणेला सुमारे एक किलोमीटर अंतरावर पौराणिक बुबळेश्वर मंदिर आहे. हे मंदिर नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या डोंगररांगेत, शांत आणि रमणीय परिसरात वसलेले आहे. पूर्वी येथे भव्य महादेव मंदिर असल्याचे उल्लेख आढळतात.

**१) बुबळेश्वर मंदिर**: या मंदिराच्या गर्भगृहात सुमारे पाच ते सहा फूट खोलवर स्वयंभू भुबळेश्वर महादेवाची प्रतिकृती दिसते. त्याच ठिकाणी महादेवाची पिंड (शिवलिंग) असून गर्भगृहाचे बांधकाम जुन्या दगडी शैलीत केलेले आहे. मंदिराच्या कळसावर व खांबांवर कोरीव नक्षीकाम आढळते. मंदिराच्या सभागृहात प्राचीन स्थापत्यशैलीचे अवशेष दिसतात. जे येथील प्राचीनतेचा पुरावा देतात. मंदिराच्या जवळच खडकात कोरलेली एक पायऱ्यांनी युक्त बारव (पाण्याची विहीर) आहे, जी पिण्याच्या पाण्यासाठी वापरली जात असे. स्थानिकांच्या मते, फार प्राचीन काळी येथे साधू-मुनींचे आश्रम असावेत.[३] भक्तांच्या कथांनुसार येथे एकदा मच्छिंद्रनाथ आणि गोरक्षनाथ हे नाथपंथीय संत भ्रमण करत असताना या कणगर परिसरात आले होते. त्या वेळी मच्छिंद्रनाथ यांनी आपल्या शिष्य गोरक्षनाथांना भिक्षा आणण्यासाठी गावात पाठवले. गोरक्षनाथ एका ब्राह्मण गृहिणीकडे भिक्षेसाठी गेले. ती स्त्री अत्यंत भक्तीभावी होती; तिने गोरक्षनाथांना प्रेमाने अन्न दिले. मच्छिंद्रनाथांना त्या अन्नातील वडे अत्यंत आवडले आणि त्यांनी पुन्हा मागितले. तेव्हा गोरक्षनाथांनी गृहिणीकडे आणखी वडे मागितले असता, ती म्हणाली, "गुरुचे नाव घेऊन स्वतःहासाठी मागत आहे. तुझ्या डाव्या डोळ्यातील बुबुळ दे, तरच मी वडे देईन." गोरक्षनाथांनी तिच्या भक्तीचा मान राखून तसे केले, परंतु आपल्या योगशक्तीने मच्छिंद्रनाथांनी तो डोळा पुन्हा पूर्ववत केला. ही घटना पाहून लोक थक्क झाले. मच्छिंद्रनाथानी त्या ठिकाणाला आपले ध्यानस्थान बनवले आणि येथे शिवशक्तीचे प्रकट झाल्यामुळे या ठिकाणाला 'बुबळेश्वर' असे नाव पडले. ही कथा 'नवनाथ भक्तिसार' या ग्रंथात उल्लेखिलेली आहे. आजही या मंदिरात अनेक भाविक दर्शनासाठी येतात. येथे सापडलेल्या





**IIP : International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ)** ISSN: 3049-2734
*Vol. 3 No. Issue - I (January-March) (2026)*

दगडी, तांबे आणि पितळेच्या मूर्ती या ठिकाणाच्या ऐतिहासिक व धार्मिक महत्वाची साक्ष देतात.सद्यस्थितीला येथील झाडाला डोळयाच्या बुबूळ असलेल्या आकार पहावयास मिळतात.[४]

तसेच बुबबळेश्वर मंदिरात यादवकालीन काळातील शिल्पसंपदेचे महत्त्वपूर्ण अवशेष आढळून आले आहेत. येथे सापडलेल्या मूर्ती कलात्मक दृष्टीने अत्यंत सुंदर आणि आकर्षक आहेत. मंदिर परिसरात शिव-पार्वती, लक्ष्मीनारायण, आदिचतुर्भुज आणि महालक्ष्मी यांच्या मूर्ती विशेषत्वाने उल्लेखनीय आहेत. या मूर्तींच्या शिल्पकामातून यादवकालीन कलाशैलीचे उत्कृष्ट दर्शन घडते.[५]

**२) कणकावतीचे मंदिर** :

कणगर गावाच्या उत्तरेस जवळच असलेल्या डोंगरावर कणकादेवीचे मंदिर वसलेले आहे. ही देवी गावाची ग्रामदैवत म्हणून ओळखली जाते. स्थानिक परंपरेनुसार हे मंदिर जागृत देवस्थान असून, स्वतःदेवीने आपल्या हातांनी हा डोंगर फोडून त्यात मंदिराची निर्मिती केली. अशी श्रद्धा आहे. हे मंदिर लेणीसदृश असून, पूर्णपणे पाषाणात कोरलेले आहे. त्याच दगडात देवीची मूर्ती कोरलेली असून तेच या मंदिराचे मुख्य आकर्षण आहे. मंदिर परिसरात लहानसा तलाव असून त्यातून या ठिकाणाचा प्राचीन धार्मिक व नैसर्गिक संबंध लक्षात येतो. पुरातत्वीय दृष्टीने पाहता या परिसरात विटांचे तुकडे, घरांचे अवशेष, खापरे व दगडी मूर्तींचे तुकडे आढळतात, ज्यावरून येथे पूर्वी मानवी वस्ती असल्याचे संकेत मिळतात. स्थानिक परंपरेनुसार या परिसरात गवळी समाजाची वस्ती होती असे मानले जाते. या प्रकारे कणकादेवीचे मंदिर हे केवळ धार्मिक श्रद्धेचे केंद्र नसून, स्थानिक इतिहास, लोकसंस्कृती आणि पुरातत्वीय अवशेषांचा संगम असलेले एक प्राचीन आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध स्थळ आहे.[६]


कणगर येथील बुबळेश्वर मंदिराजवळील बाम्बेत सापडलेली यादवकालीन शिल्पे
-छायाचित्र : शिवराज स्टुडिओ, राहुरी फॅक्टरी

**कणगर गावाचा ऐतिहासिक वारसा**:

प्रत्येक गाव ऐतिहासिक दृष्ट्या विशिष्ट महत्त्वाचे स्थान राखून असते. गावाच्या इतिहासाचा अभ्यास करताना त्या ठिकाणातील प्राचीन वास्तू, मंदिरे, स्मारके व पुरावशेष हे इतिहासाचे प्रमुख घटक ठरतात. या वास्तू व वस्तू त्या काळाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक परिस्थितीचे प्रतिनिधित्व करतात. कोणत्याही गावाचे ऐतिहासिक महत्त्व त्या गावाच्या प्राचीनतेत, परंपरेत व सांस्कृतिक वारशात दडलेले असते. गावाच्या नावाची उत्पत्ती, त्यासंबंधित पुराणकथा, दंतकथा, स्थानिक समजुती आणि लोकपरंपरा यांचा अभ्यास केल्यास त्या गावाच्या इतिहासाचा उगम आणि विकासक्रम स्पष्टपणे समजून घेता येतो. गावाच्या नावातच त्या गावाचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा दडलेला असतो.[७]

**गावातील ऐतिहासिक वास्तू** : हे गाव पेशवेकालीन वसलेले असून गावाला पौराणिक पार्श्वभूमी लाभली आहे. या ठिकाणी अनेक पुरातन अवशेष आढळून येतात. यामध्ये गावातील पांढरी गढी, वाड्याचा पाया, वाडे, बारव, वेस आहे.

**१) पांढरी** : गावाच्या पश्चिमेला मोठी पांढरी आहे. पांढरीत जुन्या वाड्यांचे अवशेष, धर्म शाळेचा पाया, मोठे घडीव दगड, घराच्या भिंती, खापराचे तुकडे, काच, राख, पांढरी माती आढळून येते.

**२) गढी:** कणगर गावाच्या पश्चिमेला घाडगे पाटलांची मोठी गढी होती. सध्या ही गढी पूर्णपणे उध्वस्त झाली असून तिचे काही अवशेषच शिल्लक आहेत. गढीचे बांधकाम दगड आणि मातीमध्ये केलेले आहे. पूर्वी पेंढारी लोक गावांवर हल्ले करून लूटमार करीत असत. त्या काळात गावातील लोक या गढीत एकत्र येऊन आपले संरक्षण करीत. आजही घाडगे पाटलांच्या वंशजांकडून अक्षय तृतीयेला गुढी उभारण्याचा आणि काठीची यात्रा काढण्याचा प्रथा सुरु आहे. पूर्वी या ठिकाणी पेंढारी लोकांचा तळ होता. त्या वेळी बाई शिंदे यांनी या लुटारूंचा नायनाट करण्यासाठी चिंचोरे गावातील एका आणि मका या दोन मंडळींना बोलावले. त्यांनी पेंढाऱ्यांचा नाश करून गावाचे रक्षण केले असे म्हटले जाते.

**३) वेस:** गावाच्या उत्तरेकडील बाजूस पूर्वी दगडात बांधलेली एक मोठी वेस होती. सध्या ही वेस पूर्णपणे नष्ट झाली असून तिचे कोणतेही अवशेष आता आढळत नाहीत.

**४) वाडे:** कणगर गावात आणि गावाच्या पश्चिमेकडील पांढरी परिसरात जुन्या वाड्यांचे अवशेष आढळतात. धर्मशाळेचा पाया मोठ्या दगडांनी बांधलेला असून त्याची रचना भक्कम स्वरूपाची होती. घाडगे पाटलांच्या वाड्याचे काही अवशेष अजूनही दिसतात; मात्र काळाच्या ओघात हे वाडे पूर्णपणे नष्ट झाले असून सध्या त्या ठिकाणी मातीचे ढिगारेच शिल्लक आहेत.

**५) बारव:** गावाच्या मध्यभागी एक बारव असून तिचे बांधकाम अलीकडच्या काळात दगडाच्या तोडीत करण्यात आले आहे. या बारवेत वर्षभर मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध असते. मात्र या पाण्याचा उपयोग प्रामुख्याने घरगुती कामांसाठी केला जातो; पिण्याच्या पाण्यासाठी याचा वापर केला जात नाही. गावाच्या पश्चिमेकडील जुन्या गावठाणात आणखी एक बारव आढळते. या बारवेतले पाणी मुख्यतः शेतीसाठी वापरले जाते. तिचे बांधकाम पूर्णपणे दगडात केलेले असून त्यावरून त्या काळातील स्थानिक कारागिरी, जलसंधारणाची जाण व पारंपारिक स्थापत्यकौशल्य स्पष्ट होते. या दोन्ही बारवा गावातील जलस्रोत व्यवस्थापनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जातात. त्या स्थानिक लोकजीवनातील जलसंस्कृतीचे प्रतीक असून, ग्रामविकासाच्या इतिहासात त्यांचे विशेष स्थान आहे.[८]



ग्रामदेवता आणि कुलदैवत या ग्रामीण समाजाच्या रक्षणकर्त्या देवता मानल्या जातात. ग्रामीण जीवनात या देवतांना आजही विशेष आणि मानाचे स्थान आहे. या देवतांच्या उपासनेतून गावातील लोकांमध्ये एकता, श्रद्धा आणि सामाजिक समरसता टिकून राहते.ऐतिहासिक दृष्ट्या, या देवतांची मंदिरे व पूजास्थळे ही केवळ धार्मिक केंद्रे नसून ती सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाची प्रतीके आहेत. अशा वास्तू समाजाच्या जीवनपद्धतीचे, श्रद्धाविचारांचे आणि सांस्कृतिक सातत्याचे दर्शन घडवतात. या धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांचे जतन करणे अत्यावश्यक आहे, कारण ती स्थळे केवळ भूतकाळाची साक्ष नसून वर्तमान आणि भावी पिढ्यांना मार्गदर्शन करणारी प्रेरणास्थाने आहेत.[९]

**संदर्भ सूची:**

१) प्रा. शेख,जमाल **'राहुरी तालुक्यातील पुरातन ऐतिहासिक मंदिरे आणि धार्मिक स्थळे'** ,२०१६,पृ.कृ.१०१
२) कदम अण्णासाहेब,**'तपोधन'** राहुरी सहकारी साखर कारखाना रौप्य महोत्सवी अंक १८८१-१९८२ पृ.कृ.११२
३) मुलाकात, श्री.पोपट सखाहरी नालकर, कणगर
४) श्री नवनाथ भक्तीसार अध्याय नववा पृ.कृ .६७,६८
५) https://nileshmanoharpande.wordpress.com
६) जोशी सुरेश, **'मूळ गंगेच्या काठी'** दैनिक सकाळ वृत्तपत्राचा विशेष अंक दि.९ जून १९९३.
७) प्रा.वांबुरकर जास्वंदी**, इतिहासातील नवे प्रवाह,** डायमन पब्लिकेशन पृ.कृ ५,६
८) समर्थ भारत अभिमान, **कणगर** दत्तक गावाचा इतिहास आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स  कॉलेज राहुरी
९) डॉ. भोसले**,** द. ता. **लोकसंस्कृती:स्वरूप आणि विशेष** पद्मगधा प्रकाशन पृ.कृ.२३